# मनोरंजनाची वेगळी वाट

* सुनीता लोहोकरे

मनोरंजनाचं क्षेत्र म्हणजे फक्त नाटक, चित्रपट, मालिका एवढंच नव्हे, तर त्यापलीकडेही या क्षेत्राची व्याप्ती आहे; सूत्रसंचालन, निवेदन, नाटक, मालिका, एकपात्री प्रयोग, नकला आणि *गेम शो*सारख्या वैविध्यपूर्ण प्रकारात लीलया संचार करणारी चैताली भंडारी हिने मनोरंजनाच्या क्षेत्राची ही व्याप्ती दाखवून देत या आगळ्यावेगळ्या क्षेत्रातही मुलींना *करियर* आहे, याचा एक आदर्शच घालून दिला आहे.

मनोरंजन क्षेत्राचं बाळकडू चैतालीला तिचे बाबा सुरेंद्र माजगावकर यांच्याकडून मिळालं. ते उत्तम नकलाकार आहेत. तिचे काका सुनीलकुमार यांच्या मदतीने ते साताऱ्यात नकला आणि जादूच्या प्रयोगांचा एकत्रित कार्यक्रम करत असत. या कार्यक्रमासाठी घरातल्या सगळ्यांचीच त्यांना उत्साही मदत होत असे. चैतालीही त्या कार्यक्रमात सहभागी व्हायला लागली. अगदी चार-पाच वर्षांची असताना तिने या कार्यक्रमांमधून विनोद सांगायला सुरुवात केली. *गंमत जंमत* या अभिनव कार्यक्रमाची कल्पना सुरेंद्र माजगावकर यांना सुचली आणि 'वयाच्या बाराव्या वर्षी चैताली खऱ्या अर्थाने या व्यवसायाकडे वळली. नावाप्रमाणेच हा कार्यक्रम धमाल विनोदी होता. विनोद, वेगवेगळे किस्से, नकला अशा अनेक गोष्टींनी भरगच्च असलेल्या या कार्यक्रमाला सातारकरांनी मोठा प्रतिसाद दिला. पिता आणि कन्येचा एकत्रित कार्यक्रम, हे या कार्यक्रमाचं वैशिष्ट्य होतं. शाळेतल्या नाटकांमध्ये आणि वक्तृत्व स्पर्धांमध्येही चैतालीचं बक्षीस ठरलेलं असायचं.

मनोरंजनाच्या क्षेत्रातच *करियर* करायचं, असा ध्यास चैतालीने घेतला. त्यातही नाटक हे तिच्या अधिक आवडीचं क्षेत्र, म्हणूनच बारावी झाल्यावर *पुणे विद्यापीठा*मध्ये *ललितकला केंद्रा*त तिने *नाट्यशास्त्रा*च्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. तिथल्या तीन वर्षांतल्या अनुभवांनी तिला आयुष्यभर पुरेल एवढी शिदोरी दिली. नाटकाचे बारकावे तिला समजले; ज्येष्ठ आणि श्रेष्ठ व्यक्तींकडून शिकायला मिळालं. त्या तिन्ही वर्षी तिने १५-२० प्रायोगिक नाटकांत कामं केली. नाटकांतून केवळ व्यक्तिरेखा रंगवल्या नाहीत, तर पार्श्वसंगीत, संहिता लेखन, दिग्दर्शन अशा विविध भूमिका तिने पार पाडल्या. *गोष्ट प्रेमाची*सारखं नाटुकलं किंवा अनिरुद्ध खुटवड यांचं *तू वेडा कुंभार* हे नाटक तिच्यासाठी संस्मरणीय ठरलं. नाटकांचे प्रयोग पुण्याबाहेरही होत असत. नाटक करताकरता तीन वर्षं कशी संपली, ते समजलंही नाही. आता नाटक, चित्रपट आणि मालिकांमधून *करियर* करायचं असेल, तर मुंबईत जाण्यावाचून पर्याय नव्हता.

'देशभरातून मुंबईत नशीब आजमावायला आलेल्या *स्ट्रगलर्स*मध्ये मीही सामील झाले. निर्माते-दिग्दर्शकांना फोन सुरू झाले. रोज २०-२५ फोन करायचे. *बायोडेटा* घेऊन भेटायला जायचे. *ऑडिशन्स* द्यायला लागले. हे सगळं सुरू असतानाच एकट्या मुलीनं मुंबईत राहाणं म्हणजे काय, याचाही अनुभव येऊ लागला. हळूहळू छोटी-मोठी कामं मिळायला लागली,' चैतालीच्या बोलण्यातून तिचं मुंबईतलं जीवन उलगडू लागलं. याच काळात तिला *सह्याद्री* वाहिनीवरची *सारीपाट हा संसाराचा* ही मालिका मिळाली. *सह्याद्री*साठी तिने बरंच काम केलं. सणांवरच्या मालिकेच्या एका भागाचं



चैताली भंडारी

४३ चवदारः अननसी चिरोटे
४४ चालता-बोलता मेडिटेशन